# विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय

# Farmers' suicide in Vidarbha : Reasons and remedies

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ 445401, महाराष्ट्र (India)
अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@hotmail.com Mob. No.: 9422867658

## गोषवारा

विदर्भातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होताना दिसते. पीकपद्धती, सिंचनाची सोय, अर्थपुरवठा, शेतमालासाठी बाजारपेठ, जोडधंदे आणि शासकीय मदत या गोष्टींशी शेतकरीजीवन निगडित असते. महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या पश्चिम विदर्भात झालेल्या आहेत आणि हा पट्टा संत्रा, सोयाबीन व कापूस उत्पादकांचा आहे. विदर्भाचा अनुशेष 2004 मध्ये 10032 कोटी रुपयांचा होता आणि तो वाढतच आहे. परिणामी अल्प सिंचनामुळे शेतकऱ्यांवरची संकटे वाढतच आहेत. आतापर्यंत ज्यांनी आत्महत्या केल्या, ते शेतकरी बहुतेक कोरडवाहूचे कास्तकार होते. ते कर्जबाजारीही होते. राष्ट्रीय बँका शेतकऱ्यांना कर्जाऊ रक्कम सहज देत नाहीत. दीनवाणा शेतकरी खाजगी सावकराची पायरी चढतो. इथे तो भरपूर नागवला जातो. त्याची शेतीही सावकार हडपतो. मग शेतकऱ्याला मरण जवळ करण्याशिवाय पर्याय राहत नाही. यावर उपाय म्हणजे शेतकऱ्यांनी वैविध्यपूर्ण पिके घ्यावी. कापूस आणि संत्रा यांवरच अवलंबून राहू नये. शेतीसोबतच कुक्कुटपालन, बकरीपालन, गाई-म्हशींपासून दुग्धव्यवसाय अशा प्रकारच्या अन्य व्यवसायाची जोड द्यावी. रासायनिक खतांपेक्षा गांडूळखतासारखे प्रकल्प राबवून शेती करावी. उत्पन्नाला व्यापाऱ्यांच्या हवाली न करता गावाची सार्वजनिक विक्री किंवा वितरणप्रणाली निर्माण करावी. बायोगॅस, सौरशक्तीकडे वळावे. स्प्रिंकलरसारखी आधुनिक जलसिंचनपद्धती वापरावी. डोंगरांवरून वाहून जाणारे पाणी अडवून बंधारे बांधावे. शेततळी निर्माण करावी. वृक्षतोडीवर बंधन घालावे. गावातून तंबाखू, बिड्या, सिग्रेटी, दारू, अफिम, चरस, गांजा अशा सर्वच व्यसनांची हकालपट्टी करावी. अंधश्रद्धा निर्मूलन, सामुदायिक विवाह, श्रमदान, स्वच्छता, शिक्षण आणि कुटुंब नियोजनावर भर द्यावा. यातून आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्व निर्माण झाल्यावर आत्महत्येकडे वळण्याचा विचारही विदर्भातील शेतकऱ्यांच्या मनाला कधी शिवणार नाही.

## Abstract

The number of farmers committing suicide in Vidarbha seems to be steadily increasing. Farmer life is concerned with cropping systems, irrigation facilities, financing, markets for agricultural commodities, side businesses and government assistance. The highest number of suicides in Maharashtra is in West Vidarbha and this belt belongs to orange, soybean and cotton growers. Vidarbha's backlog was Rs. 10032 crore in 2004 and it is increasing. As a result, shortages of irrigation continue to plague farmers. Most of the farmers who committed suicide so far were dryland tax collectors. They were also in debt. National banks do not lend easily to farmers. The poor farmer climbs the steps of a private lender. His farm is also grabbed by moneylenders. Then the farmer has no choice but to die. The solution is for farmers to grow a variety of crops. Don't rely on cotton and oranges. Along with agriculture, other businesses such as poultry, goat rearing, dairy farming from cows and buffaloes should be added. Farming should be done by implementing projects like vermicompost rather than chemical fertilizers. The public sale or distribution system of the village should be created without handing over the income to the traders. Turn to biogas, solar energy. Use modern irrigation systems like sprinklers. Small dams should be built to block the flow of water from the hills. Ponds are to be created. Restrict tree felling. All addictions like tobacco, bidis, cigarettes, alcohol, opium, hashish, cannabis should be expelled from the village. Emphasis should be placed on eradication of superstition, community marriage, labor, hygiene, education and family planning and then the thought of turning to suicide will never cross the minds of the farmers of Vidarbha.

## बीजशब्द

विदर्भ, शेतकरी, आत्महत्या, अनुशेष, कापूस, संत्रा, कर्ज

## विषय विवेचन

सकाळी सकाळी वृत्तपत्र उघडले की नजर जाते ती विदर्भातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ झालेल्या आकड्यांवर. कुठल्याही प्रगत किंवा प्रगतिशील राष्ट्रासाठी शेतकऱ्यांच्या आत्महत्या भूषणावह नसतात. गेल्या काही वर्षांपासून या विषयावर सातत्याने चर्चा होते आहे. कर्जबाजारीपणामुळे ह्या आत्महत्या होत आहेत, यावर बहुतेकांचे एकमत आहे. कर्जबाजारीपणा, नापिकी, दुष्काळ आणि अतिवृष्टी यांव्यतिरिक्त घरगुती भांडणे, इस्टेटीचे वाद, मानसिक असंतुलन, दारू, मटका, जुगार आदींच्या आहारी जाणे अशी कारणे शेतकऱ्यांना आत्महत्येच्या निर्णयापर्यंत सहसा पोचवत नाहीत, असा काहीसा सूर आढळतो. एक मत असे आहे की, जागतिक व्यापार संघटना आणि अमेरिकेची मर्जी राखण्याच्या आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू आहे. तथ्य काय? शेतकरी एवढ्या मोठ्या संख्येने आत्महत्या का करीत आहेत? का बरे गावकरी गाव विकायला काढल्याच्या किंवा किडनी विकण्याच्या जाहिराती करीत आहेत? या सर्व प्रकाराला जबाबदार कोण? शासन, सावकार, सहकारी पतसंस्था, बँका की खुद्द शेतकरी? अशा या विविध प्रश्नांची आणि उपाययोजनांची चर्चा करण्याचा प्रयत्न येथे केला आहे. उद्देश हाच की जगाचा पोशिंदा म्हणविला जाणारा हा कास्तकार स्वतःचे पोटही का भरू शकत नाही, कुठल्या समस्यांच्या जाळ्यात तो अडकला आहे, याची जाण दोन वेळचे पोटभर खाऊन स्वखुशीत रममाण होत आनंदाने ढेकर देणाऱ्या वर्गाला व्हावी.

महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, पंजाब या राज्यांतही शेतकरी आत्महत्या करीत आहेत. पीकपद्धती, सिंचनाची सोय, अर्थपुरवठा, शेतमालासाठी बाजारपेठ, जोडधंदे आणि शासकीय मदत या गोष्टींशी शेतकरीजीवन निगडित असते. सिंचनाची सोय नसणाऱ्या ओरिसात आणि राजस्थानात आत्महत्या नाहीत; पण केरळमध्ये भरपूर पाणी असताना व एक्याण्णव टक्के सिंचनाची सोय असणाऱ्या पंजाबसारख्या राज्यात आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. यामागचे मुख्य कारण म्हणजे तेथील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा होय. त्या राज्यांमध्ये सरकारने अधिक प्रमाणात कर्जवाटप केले आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या पश्चिम विदर्भात झालेल्या आहेत आणि हा पट्टा संत्रा, सोयाबीनपेक्षाही जास्त प्रमाणात कापूस उत्पादकांचा आहे. तसेच यवतमाळ जिल्ह्यातील श्रीक्षेत्र चिंतामणी कळंब येथेच कापसाचा शोध लागला होता, म्हणूनच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांशी कापसाच्या शेतीचा विचार येथे अधिक केला आहे.

या समस्येच्या मुळाशी जाताना सर्वप्रथम आर्थिक मुद्याचा विचार करावा लागतो. महाराष्ट्रात शेतकऱ्यांना कर्जवाटप सहसा सहकारी संस्थांमार्फत होते. मात्र राष्ट्रीय बँकांनी मोठ्या प्रमाणात कर्जवाटप केल्याने सहकारी संस्था मोडकळीस आल्या. ग्रामीण भागात लहान शेतकऱ्यांना त्या कर्ज देऊ शकत नव्हत्या, म्हणून शेतकरी खाजगी सावकारांकडे वळले. तिथे त्यांची मोठी लूट झाल्याने त्यांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला. केंद्र सरकारने जिल्हा बँका बळकट करण्यासाठी प्राध्यापक वैद्यनाथन समिती नेमली. ह्या समितीने केलेल्या शिफारशींनुसार सोळा हजार कोटींपैकी तेरा हजार कोटी रुपये केंद्र सरकार तर उर्वरित तीन हजार कोटी रुपये राज्य शासन देणार होते; मात्र अंमलबजावणी झाल्याचे आढळत नाही.

ज्या राज्यात एकपीकपद्धती आहे, तेथील शेतकरी तुलनेने गरीब आहेत. विशेषतः पश्चिम विदर्भातील शेतकरी वर्षातून एकच पीक घेतात. दुहेरी पीक घेण्यासाठी पाण्याची गरज असते. या भागातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात खाली गेल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. येथील शेती पारंपरिक पद्धतीने केली जाते. सिंचनात नवीन तंत्रज्ञान सहसा आढळत नाही. सिंचनाच्या सोयी कमी असल्यामुळे योग्य वेळी पिकाला पाणी मिळत नाही. परिणामी पीक कमी येते. काही वेळा बियाण्यांची प्रत चांगली नसते. भारनियमनामुळे शेतीला वेळेवर पाणी देता येत नाही. याशिवाय उन्हाळा कडक असल्याने उन्हाळी पिकेही घेता येत नाहीत.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रातील ज्या प्रदेशात सर्वाधिक प्रमाणात झाल्या आहेत, त्या विदर्भाचा अनुशेष इ.स. 1982 मध्ये 527 कोटी रुपयांचा होता. इ.स. 1990 मध्ये तो 1550 कोटी रुपयांचा झाला. 1992 मध्ये 2547 कोटी, 1994 मध्ये 4265 कोटी, 2004 मध्ये 10032 कोटी रुपयांचा झाला आहे. हा अनुशेष देण्यासाठी शासन कायमच उदासीन राहिले आहे. परिणामी सिंचनाविना किंवा अल्प सिंचनामुळे शेतकऱ्यांवरची संकटे वाढतच आहेत. आतापर्यंत ज्यांनी आत्महत्या केल्या, ते शेतकरी बहुतेक कोरडवाहूचे कास्तकार होते. ते कर्जबाजारीही होते. जलसिंचनाचा अनुशेष असणाऱ्या जिल्ह्यांतील होते. मात्र ज्यांची शेते जलसिंचनक्षेत्रात येतात, ज्यांच्या शेताच्या कडेने पाटाचे पाणी वाहते, त्यामुळे चाराही भरपूर उपलब्ध असतो, त्यांनी गाईम्हशी आपल्या दाराशी बांधल्या आहेत, दूधदुभत्यासोबतच शेणखताचीही उपलब्धता तेथे होते आहे, अशा शेतकऱ्यांच्या मनात आत्महत्येचा विचार येत नाही.

विदर्भ पांढऱ्या सोन्याचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. पश्चिम विदर्भातील कापूस हे प्रमुख नगदी पीक आहे. कापसाच्या जोडीला ज्वारी, तूर अशीही पिके घेतली जातात. कापसाची लागवड साधारणपणे जून महिन्यात केली जाते.

सहा ते सात महिन्यांनी पीक हाती येते. परिणामी त्या जमिनीत रब्बी हंगामात दुसरे पीक घेता येत नाही. ज्वारीवर अवेळी पावसाचा आणि तुरीवर किडीचा बऱ्याचदा दुष्परिणाम होतो व पिके बुडतात, म्हणून ही पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जात नाहीत.

येथील शेतकऱ्यांच्या आत्महत्येला आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे बी.टी. कॉटनमुळे काही प्रमाणात, काही भागात आलेली नापिकी होय. आंध्रप्रदेश सरकारने बी.टी. कॉटनवर बंदी घातली, तर महाराष्ट्रात शासनाने शेतकऱ्यांना बी. टी. कॉटन लावण्यास प्रोत्साहित केले. बी.टी. कॉटनच्या अपयशाने आंध्रप्रदेश सरकारने कोट्यवधी रुपयांचा दावा ठोकला. महाराष्ट्र शासनाने मात्र दीर्घकाळ पावले उचलली नाहीत. शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनीवर आणलेले सिलिंग, त्यातून जमिनीचे वाटप, पाच एकराच्या आतील शेतकऱ्यांसाठी दिलेल्या सवलती – त्यात जवाहर विहीर योजना अथवा सारा माफ वगैरे – यांमधून विभक्त कुटुंब पद्धतीकडे कल वाढला आहे. अशा कारणांमुळे अनेक शेतकरी पाच एकर अथवा त्यापेक्षा कमी जमीन असलेले अल्पभूधारक शेतकरी म्हणून ओळखले गेले. ज्याने वशिला लावला, लाच दिली त्याला शासकीय योजनेतून विहीर, पंप अथवा अन्य मदत मिळाली. ज्याला हा भ्रष्टाचार जमला नाही, असा बापडा शेतकरी दारिद्र्यावस्थेत खितपत पडला. दुसरे म्हणजे जी कुटुंबे एकत्र नांदत आहेत, त्यांना सामुहिक कष्ट करावे लागतात. त्यांना मजुरांचा प्रश्न भेडसावत नाही. तेथे एकमेकांचा आधार आहे. त्यांच्या जमिनीचे तुकडे झालेले नाहीत आणि परिणामी शासकीय योजनांपासूनही ते दूरच आहेत. ते आत्महत्या करताना दिसत नाहीत; पण अल्पभूधारक, सवलतींचा लाभ घेणारे कास्तकार मात्र मोठ्या संख्येने आत्महत्या करीत आहेत.

शिक्षणाचा अभाव असल्याने अल्पस्वल्प कोरडवाहू जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीत राबण्याशिवाय उत्पन्नाचे दुसरे साधन नाही. कुटुंबनियोजनाची जाणीव नसल्याने अधिक संतती असलेल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह 2–4 एकर शेतीच्या भरवशावर होणे कठीणच! गरिबीमुळे बीबियाणे विकत घेणे, नांगरवखर भाड्याने आणणे ह्यासाठी आणि शेतीच्या मशागतीसाठी पैसा लागतो. राष्ट्रीय बँका सहसा अशा शेतकऱ्यांना कर्जाऊ रक्कम देत नाहीत. सहकारी बँका, पतसंस्था स्वतःचे हित पाहून भरपूर व्याज आकारून कर्ज देतात. येथेही शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेणारे टपून बसलेले असतात. कमी रक्कम शेतकऱ्याच्या हाती सोपवून जास्त रकमेच्या कर्जावर सही घेतली जाते आणि मग असे भरमसाठ वाढत गेलेले कर्ज व्याजासह फेडणे जवळजवळ अशक्य होते.

राष्ट्रीय बँका किंवा सहकारी संस्थांकडे कर्ज थकित झाल्यावर दीनवाणा शेतकरी खाजगी सावकराची पायरी चढतो. इथेही तो भरपूर नागवला जातो. कर्जाची रक्कम चक्रवाढ व्याजाने वाढत जाते. स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन शेतकरी जमेल तेवढी रक्कम व्याजापोटी सावकाराच्या खिशात घालतो, तरीही मुद्दल फिटत नाही. अखेरीस त्याची शेतीही सावकार हडपतो. मग शेतकऱ्याला मरण जवळ करण्याशिवाय पर्याय राहत नाही.

एकंदरीत शासकीय भ्रष्ट यंत्रणा, व्यापारी, दलाल, कारखानदार, लुटणाऱ्या सहकारी बँका, पतसंस्था, सावकार या सर्वांनी शेतकऱ्याला गुलाम बनवून त्याचा जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे. भूविकास बँका, सहकारी संस्था इत्यादींकडून कर्ज घेताना प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्याला लाच द्यावी लागते. मलिदा खाणारे सर्वत्र आहेत. कष्ट करणारा शेतकरी फक्त नागवला जातो. वैध सावकारीच्या नावाखाली व्याजाची रसीद दीड टक्क्यांची दाखवायची आणि बिनारसीद साडेतीन टक्क्यांनी वसूल करायचे. ह्या व्यवहाराकडे शासन दुर्लक्ष का करते?

मोठ्या हिमतीने, आशेने, कष्टाने शेतात पेरणी करावी आणि निसर्गराजाने फटका द्यावा. कधी अतोनात पाऊस, तर कधी कोरडा दुष्काळ. आभाळातलं पाणी असं शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी आणतं. जिवापाड कष्ट करूनही पीक हाती आलं नाही किंवा अपेक्षेपेक्षा खूपच कमी आलं, तर त्याने बिचाऱ्याने घरातील मंडळींना काय खाऊ घालावे? आणि सावकाराचे कर्ज कसे फेडावे?

मुलांच्या, घरातील वृद्धांच्या किंवा पत्नीच्या अंगावर फाटकी लक्तरे पाहून तो विषण्ण होतो. अशातच मायबाप सरकारने खेडोपाडी दारूचे गुत्ते उघडून दिले आहेत. दारूच्या नशेत घरच्या बायकोमुलांना मारहाण, अद्वातद्वा शिविगाळ हे प्रकार होतात. सुखाने जगण्याचा कुठलाही मार्ग सापडत नाही, म्हणून तो आत्महत्येला जवळ करतो. लुळे–लंगडे, एक वेळचे पोटभर अन्नही न मिळवू शकणारे लाचार भिकारी आत्महत्या करताना दिसत नाहीत. जगण्यासाठी चिवट झुंज ते देतात. मरण येऊ नये म्हणून पोटतिडिकीने भीक मागतात; आणि शेतकरी मात्र नैराश्यग्रस्त, वैफल्यग्रस्त झालेला आहे. या मागचे एक कारण म्हणजे भिकाऱ्यांना मानहानीचे दुःख नसते, त्यांचे जिणे इतरांना लाजिरवाणे वाटत असले, तरी त्यांना त्याचे काहीच वाटत नाही. पोटाची खळगी भरणे, हा एकमेव उद्देश त्यांच्या डोळ्यांपुढे असतो; मात्र जो शेतकरी मानाचे जीवन जगलेला असतो, समाजात पत राखून असतो, मुलाबाळांच्या विवाहात ऐटीने मिरवीत असतो, तो बँका, सहकारी संस्था, सावकार अथवा शासन यांच्याकडून दिल्या गेलेल्या अपमानास्पद वागणुकीने आतल्याआत धुमसत असतो, आक्रंदत असतो. 'नको जिणे लाजिरवाणे' या न्यायाने तो समाजात आपली पत राखण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो आणि जेव्हा त्याचे प्रयत्न संपतात, दैववादावरची निष्ठा संपते आणि समाजातील अनिष्ट प्रवृत्तींचा तो बळी ठरतो, तेव्हाच हा बळीराजा स्वतःचे सरण रचून त्यावर उडी घेतो.

शासनाकडून शेतीविषयक योग्य मार्गदर्शन गरीब शेतकऱ्यांना मिळत नाही. नवनवीन शेतीचे प्रयोग शेतकऱ्यांपर्यंत पोचत नाहीत. सामाजिक प्रदूषण, राजकीय कंत्राटदारी यांमुळे अनैसर्गिक दुष्काळासारखी स्थिती निर्माण होते. अडाणी, अशिक्षित शेतकरी परंपरेने माहीत असलेली पिके घेत असतो. त्याऐवजी त्याच्या शेतीत इतर काही लागवड करून अधिक उत्पादन मिळविणे शक्य आहे किंवा नाही, हे कृषी खात्यातील मंडळी सांगू शकतात; पण खेड्यापाड्यांतून अशा कार्यालयात काम करणारे तज्ञ सहसा श्रीमंत शेतकऱ्यांची 'हाजी हाजी' करून स्वतःच्या खिशात अतिरिक्त रक्कम टाकण्याच्याच विचाराचे असतात. आपल्याला ज्या कामासाठी पगार मिळतो ते काम इमानदारीने करावे, असे सध्याच्या काळात कोणत्याच खात्यातील अधिकाऱ्यांपासून कर्मचाऱ्यापर्यंत कुणालाही वाटत नाही. भ्रष्टाचार आणि लाचलुचपतीने सगळ्या माणुसकीचा धिंगाणा झाला आहे. भरपूर पैसे देईल त्या शेतकऱ्यालाच शासकीय योजनांचा लाभ देणारे हे अस्तनीतले निखारेही काही प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्येला जबाबदार आहेतच.

शेतमालाचे भाव वाढत असल्याची भीती दाखवत सरकार गहू आणि कापसाची आयात करीत आहे. त्यामुळे देशात शेतमालाचे भाव पडतात. रोजगार हिरावण्याचे हे शासनाचे धोरण आहे. जगात कुठेही मुक्त अर्थव्यवस्था नाही. ती आहे म्हणणे म्हणजे शुद्ध फसवणूकच म्हटली पाहिजे. डेन्मार्कमध्ये शेतकऱ्यांना एक गाय पाळण्यास वार्षिक अकरा हजारांचे अनुदान मिळते. अमेरिकेत कापूस उत्पादकांना भरपूर अनुदान दिले जाते. भारतात मात्र अनुदान देण्यात सरकार कुचराई करते. शेतमालाचे भाव कमी होत आहे, ही विसंगती थोपविण्यास शासन काहीच पावले उचलत नाही.

आपल्याच शेतात निर्माण केलेल्या पिकाची बिजवाई काढून कमी खर्चाची बिजवाई वापरण्याची इच्छा असलेल्या शेतकऱ्याला शासकीय आग्रहाने, दिशाभुलीने महागडे संकरित बियाणे वापरावे लागते. घरचे दागदागिने गहाणात अडकल्याने मिळेल त्या भावात गोधन कसायास विकावे लागते. परिणामी शेणखत उपलब्ध होत नाही. संकरित बियाणांना रासायनिक खतांशिवाय पर्याय नाही, असा प्रचार केला जातो. काही वेळा मजुरांचे अडेलतट्टू घोरण आणि पिकवलेल्या मालाला अल्प बाजारभाव अशा अनेक कारणांमुळे कर्जबाजारीपणाला सुरुवात होते.

काही मोजके धनदांडगे शेतकरी सोडले तर बहुतेकांना शेतीसाठी दरवर्षी कर्ज काढावे लागते. शेतीत सुधारणा करण्यासाठी मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या कर्जाचीही आवश्यकता असते. ही कर्ज सहज उपलब्ध व्हावीत, ही शासनाची जबाबदारी असते. शेतीखर्च आणि शेतीकर्ज यासंदर्भात शासनाची धोरणे निश्चित असावयास हवीत; पण इ.स. 1990 पासून अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप न करण्याचे घोरण सर्वच सरकारांनी स्वीकारल्याने आपली अर्थव्यवस्था जागतिक बाजारांवर सोपविल्या गेलेली आहे. भारतात चैनीच्या वस्तू शून्य टक्क्यांपासून सहा टक्के व्याजदरापर्यंत मिळतात. गृहकर्जासाठी किंवा गाडी घेण्यासाठी केवळ सात ते आठ टक्के व्याजदरात कर्जपुरवठा होतो. टाटा, बिर्ला, अंबानींसारख्या अनेक व्यावसायिक भांडवलदारांना नऊ टक्के व्याजदराने कर्ज मिळते. गरीब शेतकऱ्यांकडून मात्र 12 टक्क्यांपासून 18 टक्क्यांपर्यंत व्याजदर सरकारी – गैरसरकारी संस्थांकडून वसूल केल्या जातो. याउलट बहुतेक विकसित देशांमध्ये शेतीला 2 ते 3 टक्के व्याजदराने कर्जपुरवठा केला जातो. चीनमध्ये हा कर्जपुरवठा शून्य टक्के व्याजदराने होतो. विकसित देशात शेतीसाठी दररोज जवळ जवळ एक अब्ज डॉलरचे अनुदान दिले जाते. युरोपियन देशात शेतमालाच्या किमतीच्या 31 टक्के अनुदान शेतकऱ्यांना दिले जाते आणि आपल्या देशात दामदुपटीने कर्जवसुली केली जाते. पाश्चिमात्य देशात शेतकऱ्यांना खत, बीबियाणे यांवर अनुदान तर मिळतेच; पण पाऊस झाला नाही किंवा अतिवृष्टी झाली तरी अनुदान मिळते. सरकारने शेतमालाचा कमी भाव ठरवला, तरीही त्या भावावर अनुदान देऊन सरकार शेतमाल खरेदी करते. आपल्याकडे सगळेच उलटे आहे

महाराष्ट्रातील शेतीकरिता केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठ्याचे आकडे बघितले, तर लक्षात येते की पश्चिम आणि दक्षिण महाराष्ट्रात केला जाणारा कर्जपुरवठा विदर्भ आणि मराठवाड्याच्या तुलनेने जास्त आहे. वास्तविक पाहता तो प्रदेश सिंचनाने युक्त आहे, तेथे सुबत्ता आहे. विदर्भ, मराठवाडा सतत दुष्काळाने, अवेळी पावसाने किंवा अतिवृष्टीने ग्रासलेला असतो. म्हणूनच दुर्बल अधिक दुर्बल होत आहेत, मागासलेले अधिकच मागासत आहेत. हा बाजारी अर्थव्यवस्थेचा परिणाम आहे.

सध्याचे जागतिकीकरण मोठ्या शोषक देशांच्या सोयीचे आहे. शेतकऱ्यांकरिता जाहीर केलेल्या पॅकेजमध्ये कापूस उत्पादकांना अग्रीम बोनस देण्याची तरतूद नाही. त्यामुळे पुन्हा कर्जाचा डोंगर नव्या स्वरूपात उभा राहील. शेतकऱ्यांना लाचार समजून मदत दिली जाते, हक्क म्हणून नाही. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हक्क म्हणून योग्य भाव दिल्या गेला पाहिजे.

कापसाचे शंभर टक्के चुकारे देण्याचे राज्यशासन जाहीर करते; परंतु दिलेला शब्द कधीच पाळत नाही. जाहीर केलेली पॅकेजेस कागदोपत्रीच राहतात. माहितीच्या संकलनातच वर्ष वर्ष निघून जातात. कर्जवसुली मात्र जोरात सुरू असते. हे धोरण केवळ सध्याच्याच सरकारचे आहे असे नाही, तर यापूर्वीच्या प्रत्येक सरकारनेही शेतकऱ्यांना अशीच वाईट वागणूक दिलेली आहे.

आज शेतकरी कोलमडून पडला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे ही कौटुंबिक किंवा अन्य असून 'शेती पिकली नाही, म्हणून आत्महत्या' हे कारणच नाही, असा जावईशोध शासन आणि त्यांचे प्रतिनिधी लावतात. या विरोधाभासाचे कारण म्हणजे कर्जामुळे, नापिकीमुळे शेतकरी जीवनयात्रा संपवू शकतात, ही वस्तुस्थिती वातानुकुलित कक्षात

बसणाऱ्या राज्यकर्त्यांच्या, अधिकाऱ्यांच्या पचनीच पडू शकत नाही. नाण्याच्या दुसऱ्या बाजूकडेही बघायला हवे. आजच्या शेतकऱ्यांत पूर्वीच्या कष्टकऱ्यांसारखी कष्ट करण्याचीही तयारी दिसत नाही. कमी श्रमात जास्त मोबदला मिळविण्याची हाव माणसाला अधोगतीला नेते. पूर्वी अर्धपोटी, उपाशी राहून राबणारा शेतकरी शासकीय मदतीविना, पॅकेजविना धान्याच्या राशी निर्माण करीत होता; परंतु लाचारीने जगत नव्हता. आज सहकारी बँकांनी किंवा वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांनी दिलेल्या अपमानास्पद वागणुकीमुळे हा स्वाभिमानी शेतकरी हतबल झाला आहे. यांतूनही तो आत्महत्येचा पर्याय स्वीकारतो आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांची तरुण मुले थोडासा शाळा–कॉलेजचा वारा लागला की इतर श्रीमंत विद्यार्थ्यांप्रमाणे स्वप्ने रंगवू लागतात. शेतीत कष्ट करण्याऐवजी पानाच्या टपरीवर, दारूच्या गुत्त्यावर, तीनपत्ती वगैरेच्या अड्ड्यावर रममाण होतात. त्यामुळे शेतकऱ्याला एकट्यालाच राबावे लागते. परिणामी उत्पादन वाढत नाही आणि शेती तोट्यात येते. पूर्वी शेतकऱ्यांच्या गरजा मर्यादित होत्या. आता शहरीकरणामुळे आणि अनुकरणामुळे ग्रामीण भागातील नवीन पिढीच्या गरजा वाढल्या आहेत. वडिलोपार्जित शेतीमध्ये विभाजन होऊन शेतीची दरडोई उपलब्धता कमी झाली आहे. परिणामी बरेच शेतकरी अल्पभूधारक झाले असून शेतीतून मिळणारे उत्पन्न त्यांना पुरत नाही, हा मुद्दाही लक्षात घेतला पाहिजे.

काही वेळा सिंचनाकरिता, कालव्यांकरिता अथवा रस्ते–महामार्ग निर्माण करण्याकरिता शासनातर्फे, कालवे व पाटबंधारे विभागातर्फे शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जातात. त्यांचा पुरेसा मोबदला दिला जात नाही आणि तोही वेळेवर कधीच नाही. कितीतरी वेळा संदर्भित कार्यालयांच्या पायऱ्या चढल्यावर, वर्षानुवर्षांच्या कोर्टकचेऱ्या केल्यावर नाममात्र रक्कम मिळते.

शासनाकडून जाहीर झालेल्या पॅकेजेसमधून प्रत्यक्ष गरजवंत शेतकऱ्यापर्यंत त्यातील रक्कम कधीच पोचत नाही. ज्याप्रमाणे बँकांमधील किंवा सहकारी संस्थांमधील कर्मचारी अथवा सावकार कमी रक्कम कर्ज म्हणून देऊन अधिक रकमेवर त्याचा अंगठा घेतात, तसेच शासनाने शेतकऱ्यांना दिलेली मदत पोचविणारे कर्मचारी झारीतील शुक्राचार्याप्रमाणे आपापला वाटा काढून घेतात व फारच थोडी रक्कम शेतकऱ्याच्या हाती देऊन मदत केल्याचा गाजावाजा मात्र वृत्तपत्रांतून भरपूर करतात.

अतिवृष्टी आणि दुष्काळ दबक्या पावलांनी माणसांच्या आयुष्यात येतो आणि तो जीवन जगण्याची ऊर्मीच संपवतो. कोट्यवधी रुपये जलसंधारणासाठी येतात; पण त्यांचा योग्य विनियोग होत नाही. ग्रामीण तरुण पानटपऱ्यांभोवती फिरतो. संपूर्ण गाव कर्जबाजारी असते; पण पैसा कुठे गेला हे कुणीच सांगत नाही.

शेतीची समस्या हा राज्यशासनाचा प्रश्न की केंद्र सरकारचा, यावरही विविध कलह माजतात. मंत्र्यांचे, आमदारांचे, खासदारांचे वेतन वाढविण्याकरिता विरोधीपक्षासह ही सगळी मंडळी एकत्र येतात. मात्र ज्यांच्या मतांच्या भरवशावर आपल्याला ही पदे मिळाली आहेत, त्यांचे हाल बघायला कुणालाच फुरसत नाही.

'गाव विकणे आहे', 'किडनी विकणे आहे' अशा प्रकारच्या जाहिराती जोर धरत आहेत. गुराढोरांच्या पाठीवरही 'विकणे आहे'चे फलक लागलेले दिसतात. राष्ट्रपतींकडे कर्जबाजारीपणामुळे इच्छामरणाची मागणी करणारे शेतकरीही आढळतात. किडनी विक्री केंद्राच्या उद्घाटनासाठी राष्ट्रपती, पंतप्रधान यांनाही निमंत्रण दिले गेले. या सर्वांतून शेतकरी जीवनाचेच नव्हे, तर संपूर्ण ग्रामीण भागातील विदारक, स्फोटक चित्र समोर येते. ग्रामीणांचे दुखणे, त्यांच्यातला असंतोष प्रकट करण्याकरिता त्यांनी निवडलेला हा प्रतिकात्मक मार्ग आहे. हिंसेऐवजी दुःख वेशीवर टांगण्याचा गावकऱ्यांचा हा मार्ग लोकशाहीला पोषक आहे; परंतु शासन त्याची नेमकी किती दखल घेते? मागे अमरावती जिल्ह्यात चारघड नदीच्या पाण्यासाठी रक्त सांडले. 'जलसत्याग्रहा'च्या आंदोलनात अमरावतीच्या पोलीस अधीक्षकांनी रिव्हॉल्व्हरमधून थेट गोळी झाडून एका पाणी मागणाऱ्या आंदोलकर्त्याला ठार केले होते. कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी असलेला खेड येथील बावीस वर्षीय प्रफुल्ल राऊत शहीद झाला होता. काही वर्षांपूर्वी निंभी गावातील नागरिकांनी अमरावतीला पाणीपुरवठा करणाऱ्या अप्परवर्धा जलवाहिनीला फोडून तहान भागवली होती; पण तेव्हा पोलिसांनी अटकसत्रात निर्माण केलेली दहशत आजही अनेकांना शहारे आणते. तरीदेखील आता शेतकऱ्यांना पाण्यासाठी अशा अनेक लढाया लढाव्या लागतील हा धडा या विविध घटनांतून मिळाला आहे.

पोलीस आणि राज्यकर्तेच शेतकऱ्यांची थट्टा करतात असे नाही, तर प्रशासकीय अधिकारीही शेतकऱ्यांचे, ग्रामीणांचे गुन्हेगार होण्यात मागे नाहीत. शेतकऱ्यांच्या आत्महत्येप्रकरणी मानवाधिकार आयोगाने बजावलेल्या एका नोटिशीला उत्तर देण्यातही प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली. एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना मानवाधिकार आयोगाने राज्याचे मुख्य सचिव, वित्त विभागाचे प्रधान सचिव, सहकार सचिव, कृषी आयुक्त, अमरावती विभागातील महसूल आयुक्त, यवतमाळ पोलीस अधीक्षक आणि अमरावती ग्रामीण अधीक्षक इत्यादींना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचा आदेश दिला होता. या प्रशासकीय अधिकाऱ्यांपैकी केवळ अमरावती विभागीय आयुक्तांनी तातडीने फॅक्सने उत्तर पाठविले, दुर्दैवाने ते वाचता येण्याजोगे नव्हते, त्यामुळे पुन्हा विभागाला खास दूत पाठवून उत्तर सादर करण्यास सांगण्यात आले. यवतमाळ जिल्हाधिकारी व नागपूर विभागीय आयुक्तांनी अहवाल सादरीकरणासाठी अवधी मागितला होता. इतरांनी उत्तर पाठविण्याची तसदी घेतली नव्हती.

काही सुखवस्तू शेतकरीही शेतीच्या नावाने कर्ज घेतात आणि त्यातून कधी मुलीचे लग्न, कधी घरातील तेरवी, कधी वर्षश्राद्ध, कधी एखादा मोठा सण, कधी वाढदिवस भव्य प्रमाणात साजरा करून त्या कर्जाचा दुरुपयोग करतात. शेतीसाठी तो पैसा वापरलाच जात नाही. शेतकऱ्यांची ही मानसिकता बदलणे आवश्यक झाले आहे.

आपल्या देशात पुरेसे पीक असताना शेतकऱ्याला योग्य भाव न देता शासन त्या वस्तू आयात करते. कापसाचे भाव शासन कमी करते. व्यापारी, दलाल शेतकऱ्यांकडून अगदी कवडीमोल भावात धान्य, भाजीपाला, कापूस खरेदी करतात आणि चढ्या भावाने विकतात. पर्यायाने ते शेतकऱ्यालाही नागवतात व सामान्य उपभोक्त्यांनाही लुटत असतात. ह्यावरही शासनाने अंकुश ठेवला पाहिजे. काही दिवसांपूर्वी एका शेतकऱ्याने आपल्या शेतातील वांगी मजुरांना पैसे देऊन तोडली. पोत्यांमध्ये भरून बाजारगावी आणली. त्याकरिता त्याला सुमारे पाचशे रुपये खर्च आला. मात्र बाजारात व्यापाऱ्यांनी वांग्यांचा भाव पाडला. या शेतकऱ्याने अल्पदरात वांगी विकण्याचा प्रयत्न केला; पण कोणत्याही व्यापाऱ्याने त्याची वांगी घेतली नाही. शेवटी त्याने एक पोतं वांगी अडीच रुपयांत विकली. आता उरलेली सात–आठ पोती परत गावी न्यायची म्हणजे अडीचशे रुपयांचा खर्च होता. शेवटी निराश आणि क्रोधित झालेल्या त्या शेतकऱ्याने सर्व वांगी रस्त्यावर टाकून दिली. ती जनावरांनी आणि काही किरकोळ विक्रेत्यांनी पळवली. आणखी एका घटनेत शेतकऱ्याने तुरी विकायला आणल्या. व्यापाऱ्यांनी भाव पाडला. एवढा खर्च करून पुरेशी मुद्दलही निघत नाही, हे पाहिल्याने निराश शेतकऱ्याने रागाच्या भरात सगळ्या तुरीला आग लावून दिली; पण एकाही व्यापाऱ्यामध्ये सहानुभूती जागृत झाली नाही. शेतकरी मेला तर मदत दिली जाते; पण दोन–चार लाख रुपये दिले म्हणजे आपले कर्तव्य संपले, असे शासनाला वाटू नये. उलट अशी दिलेली रक्कम शेतकऱ्याचे नातेवाईक शेतीच्या कामासाठीच वापरतात, याबाबत लक्ष ठेवले पाहिजे आणि मृतांच्या नातेवाइकांना योग्य मार्गदर्शनही केले पाहिजे.

कापसासह विविध कृषीमालाची भाव ठरविण्याची पद्धत सदोष असून ती बदलणे आज गरजेचे आहे. कृषी उत्पादनांना मिळणाऱ्या भावात सत्तर टक्के शेतकऱ्यांचा काहीच फायदा होत नाही. सध्याची कृषीमालाची हमी भाव ठरविण्याची पद्धत कालबाह्य झाली आहे. विदर्भातील कापूस उत्पादकांना उत्पादनखर्च भरपूर असून अल्प भाव मिळतो. कापसाच्या भावाचा संबंध महागाईच्या निर्देशांकाशी जुळविल्या जावा. शेतमालाचे भाव ठरविताना पेरणीपासून कापणीपर्यंतचा शेतीचा खर्च तज्ज्ञांकडून मागविला जातो. छोट्या, मध्यम आणि मोठ्या शेतीखर्चाची माहिती संकलित केली जाते. कृषी मंत्रालयाच्या तज्ज्ञांकडूनही ही माहिती मागविली जाते. कृषीमालाच्या ग्राहकांचे हित पाहिले जाते. राज्यसरकार आणि कृषी विद्यापीठ यांचे हित पाहून देशाच्या अर्थव्यवस्थेच्या समतोलाचा संबंध राखून शेतीमालाचे भाव ठरविले जातात.

उसाला, द्राक्षाला, दुधाला भाव वाढवून मिळतो; पण कापूस उत्पादक शेतकरी कोरडाच राहतो. वैदर्भीय कापूसपट्ट्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या पाहता विशेष बाब म्हणून सरकारला अग्रीम बोनस जाहीर करता येऊ शकतो; पण विदर्भातले आमदार, खासदार, मंत्री यांना इथल्या शेतकऱ्यांच्या दुःखाशी काही घेणेदेणे नाही. इ.स. 1972 मध्ये राज्यात भयंकर दुष्काळ पडला होता. मुख्यमंत्रीपदी वसंतराव नाईक होते. गावात कोणी भुकेने किंवा आत्महत्येने दगावला तर पोलीसपाटलाला जबाबदार धरले जाईल, असे त्यांनी जाहीर केले होते. त्यांच्यानंतर शेतकऱ्यांचा, गरिबांचा, ग्रामीणांचा कळवळा असणारा एकही मुख्यमंत्री किंवा साधा आमदारही झाला नाही, हे महाराष्ट्राचे आणि विदर्भाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.

दरवर्षी नागपुरात हिवाळी अधिवेशन होते. केवळ सहल म्हणून पर्यटकांच्या भूमिकेत मंत्री किंवा आमदार येथे प्रवेशतात. ताडोबासारख्या जंगलांत जाऊन अरेरावी करतात. नागपूरकरांच्या वाहतुकीला अडथळा निर्माण करतात. पोलीस दलावर त्यांच्या सुरक्षेचा अतिरिक्त कार्यभार टाकतात. कोट्यवधी रुपयांचा चुराडा करून जातात; पण इथलंच खाऊन इथल्या अन्नाला जागत नाहीत

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी किंवा शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी काही उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. स्वतः शेतकऱ्यांनी मनापासून कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे. शासनाकडून आणि समाजसेवकांकडून त्यांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन झाले पाहिजे. कृषी महाविद्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्यामार्फत शेतकरी मेळावे घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना दिली जावी. शेतीविषयक होणाऱ्या नवनवीन प्रयोगांची आणि योजनांची माहिती शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातच मिळाली तर सोयीचे होईल. त्यासाठी शेतकरी शिक्षित असणेही महत्त्वाचे. पदवी मिळवल्यानंतर शेतकऱ्यांची तरुण मुले शेतीत कष्ट करण्याऐवजी नोकरीसाठी शहरात धावतात. शेतीत कष्ट करून माझ्या ज्ञानाचा फायदा सर्वांना करून देईन, असा संकल्प तरुण शेतकऱ्यांनी केला पाहिजे. शेतकऱ्यांनी वर्षातून किमान दोन पिके घेतली पाहिजेत. सध्या सोयाबीनकडे वाढता कल आहेच. संत्र्याच्या झाडांमध्ये गहू पेरणारेही शेतकरी आता दिसू लागले आहेत. खरीप हंगामात गहू, हरभरा, भाजीपाला, फळे, फुले अशी पिकेही घ्यावीत. कडक उन्हाळ्यामुळे वैदर्भीय शेतकऱ्यांसाठी शीतगृहे उभारली जावीत. त्याकरिता शासकीय अनुदान मिळावे, जेणेकरून शेतकरी उन्हाळ्यात भाजीपाला, फळे, फुले अशी पिके घेऊ शकतील. शासनाची मदत किंवा विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत खऱ्या अर्थाने आणि पूर्ण लाभाने पोचल्या पाहिजेत. मध्यस्थांनी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावणे आवश्यक आहे. बोगस बीबियाणे, निःसत्त्व खते किंवा

फवारणीची औषधे यांबाबत गुन्हेगारांना त्वरित कडक शिक्षा झाल्या पाहिजेत. शासनाने कापसाचा भाव वाढवून द्यावा. परदेशी कापूस भारतात येऊ नये, म्हणून आयात कर वाढवावा. बीबियाणे, खते, रसायने सवलतीच्या दरात शेतकऱ्यांना द्यावी. शेतकऱ्याच्या मालाचे पैसे हप्ते न पाडता एकरकमी व वेळेवर द्यावेत. सर्वप्रकारच्या कर्जाची माफी शासनाने करावी. विनामूल्य नाही; पण शेतीकरिता नाममात्र दरात भारनियमनाविना वीज पुरवावी. राजकीय नेत्यांनी समाजकारणावर जोर देऊन प्रामाणिकपणे जनतेचे प्रश्न सोडवावे. सिंचनाच्या सोयी वाढवाव्यात. शेततळे, गावतलावांची निर्मिती व्हावी. कापसावर आधारित प्रक्रिया उद्योग – जसे जिनिंग, प्रेसिंग, सूतगिरणी इत्यादींमध्ये शेतकऱ्यांना सहभागी करावे, म्हणजे त्यातून मिळणारा नफा त्यांच्याही वाट्याला येईल. अमरावती जिल्ह्यातील मोर्शी, वरुडसारख्या संत्र्याच्या प्रदेशातील पाण्याची पातळी फार खोल गेलेली आहे. तिथेही जलसिंचन योजना राबवण्याची गरज आहे. संत्र्यावरील प्रक्रिया उद्योग जो गेल्या काही वर्षांपूर्वी राजकीय कारणांनी बारगळला आहे, तो पुन्हा नव्या दमाने सुरू करणे गरजेचे आहे. संत्र्याला बाजारपेठ आहे; पण ती व्यापाऱ्यांच्या मर्जीवर असल्याने संत्रा उत्पादकांना फायदा कमी आणि व्यापाऱ्यांना प्रचंड असे गणित आहे. यावर शासनाचे नियंत्रण हवे. पीक विमा योजना योग्य पद्धतीने राबविली जावी. शासकीय संस्थांनी, बँकांनी, सहकारी संस्थांनी आणि वैध सावकारांनी कर्जवसुली करताना संयम दाखवावा. शेतकऱ्यांचे मनोधैर्य खचेल, असे कुठलेही पाऊल उचलू नये. शेतकऱ्यांना पेन्शन योजना लागू करावी. शेतकऱ्याला विक्रीव्यवस्थेचे आजही पुरेसे ज्ञान नाही. कृषी उत्पन्न बाजार समित्या असो किंवा व्यापारी व्यवस्था, शेतकरी कायम विक्रीबाबत परावलंबी राहिलेला आहे. स्वतःच्या उत्पादनाची किंमत त्याला ठरविता येत नाही. हे परावलंबित्व संपविण्यासाठी नव्या धोरणांचा विचार व्हावा. सर्व शेतमालाला हमीभाव असावा. व्यापाऱ्यांवर, कृषीकेंद्रांवर, सावकारांवर सरकारचे लक्ष आणि अंकुश असणे गरजेचे आहे. टर्मिनल मार्केटद्वारे शेतमाल थेट विदेशात जाणार असला तरी जागतिक उत्पादनाशी शेतकऱ्याला स्पर्धा करावी लागणार आहे, म्हणून मालाचा दर्जाही उत्तम राखण्याकरिता मार्गदर्शनाची गरज आहे.

परंतु शेतकऱ्यांनो, तुम्ही आत्महत्या करू नका. परिस्थितीशी लढा. संपूर्ण गाव एक व्हा. 'मी माझ्या गावासाठी' ही भूमिका ठाम करा. शासनाकडून फारशा अपेक्षा ठेवू नका. वैविध्यपूर्ण पिके घ्या. कापूस आणि संत्रा यांवरच अवलंबून राहू नका. शेतीसोबतच कुक्कुटपालन, बकरीपालन, गाई–म्हशींपासून दुग्धव्यवसाय अशा प्रकारच्या अन्य व्यवसायाची जोड देण्याचा प्रयत्न करा. रासायनिक खतांपेक्षा गांडूळखतासारखे प्रकल्प राबवून शेती करा. शेतीतून किंवा जोडधंद्यातून निर्माण होणाऱ्या उत्पन्नाला व्यापाऱ्यांच्या हवाली न करता गावाची सार्वजनिक विक्री किंवा वितरणप्रणाली निर्माण करा. सार्वजनिक संडासांची निर्मिती करा. त्यावर बायोगॅस प्रकल्प आणि त्यावरून निर्माण करता येणाऱ्या विजेच्या प्रकल्पाचाही विचार करा. सौरशक्तीद्वारे सार्वजनिक दिव्यांची व्यवस्था करा. पाण्याचा पुरेपूर वापर करून देणारी स्प्रिंकलरसारखी आधुनिक जलसिंचनपद्धती वापरा. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हे घोषवाक्य लक्षात ठेवा. पोपट पवारांच्या गावाचा किंवा अण्णा हजारेंच्या राळेगणसिद्धीचा पॅटर्न राबवा. त्याकरिता गाव एक झाला पाहिजे. गावाजवळच्या डोंगरांवरून वाहून जाणारे पाणी अडवा. बंधारे बांधा, शेततळी निर्माण करा. नाला बंडिंग, गॅबियन बंधारे, दगडांचे बांध, सिमेंट बंधारे यांची निर्मिती करा. पाण्याच्या थेंबाथेंबाचा उपयोग करा. पाणी जिरलं तर तुमच्या गावाची जमिनीखालील पाण्याची पातळी वाढेल. जमिनीत ओलावा निर्माण होईल. पिके चांगली येतील; पण पिकांना आवश्यकतेइतकेच पाणी द्या. अधिक पाण्याने अधिक पीक येत नाही, पाणी वाया जाते. पाऊस अधिक पडावा म्हणून जास्तीतजास्त वृक्षारोपण करा. वृक्ष ढगांना आकर्षित करतात आणि पावसाचं प्रमाण वाढतं. वृक्षतोडीवर बंधन घाला.गावातून तंबाखू, बिड्या, सिग्रेटी, दारू, अफिम, चरस, गांजा अशा सर्वच व्यसनांची हकालपट्टी करा. अंधश्रद्धा निर्मूलन, सामुदायिक विवाह, गावासाठी सामुहिक श्रमदान, सर्वांसाठी आरोग्य व स्वच्छता यांवर भर द्या. शिक्षणाचं आणि कुटुंब नियोजनाचं महत्त्व जाणा. 'छोटे कुटुंब, सुखी कुटुंब' ही म्हण विसरू नका. सावकारी पाशाची हकालपट्टी करा. महिला बचत गटांची निर्मिती करा. धान्यबँका निर्माण करा. गावाला स्वयंपूर्ण करण्यावर जोर द्या. अण्णा हजारेंनी जर अवर्षणग्रस्त भागात राळेगणसिद्धीला हिरवेगार करून दाखवले, पाण्याची मुबलकता निर्माण करून दाखवली, शेती उत्तम प्रकारे पिकवून दाखवली, तसेच तुमच्या गावातील सर्वच पदाधिकाऱ्यांपासून तळागाळातील शेतमजुरापर्यंत तुम्ही एक होऊन ग्रामविकासाचे पाऊल टाका. तुम्ही स्वयंपूर्ण झालात, तर तुमचे संपूर्ण गाव स्वयंपूर्ण होईल. मग तुमच्या आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्वाला आत्महत्येकडे वळण्याचा विचारही कधी शिवणार नाही.

## संदर्भ ग्रंथ


1. खुपसे, डॉ. मार्तंड, शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंता आणि चिंतन, समीर प्रकाशन, कळंब, प्रथमावृत्ती, 2006.
2. बेकरे, दिवाकर, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या कशा?, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, 2008.
3. जहागिरदार, दि.व्यं., कदम, धीरज, शेतकऱ्यांच्या आत्महत्या : संदर्भ यवतमाळ जिल्ह्याचा, सेंटर फॉर एकॉनॉमिक अँड सोशल स्टडीज, अमरावती, प्रथमावृत्ती 2008.
4. देशमुख, बी.टी., महाराष्ट्रातील जल सिंचन अनुशेष क्ष किरण परीक्षा, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 1998.

5. लांजेवार, नरेंद्र, शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंतन आणि उपाय, सुमेरू प्रकाशन डोंबिवली, प्रथमावृत्ती.

Presented and Published at
Proceeding of National conference on विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय (Farmers' suicide in Vidarbha : Reasons and remedies), 29/01/2014, Arts and Science College, Pulgaon, ISBN 978-93-5104-693-6, pp. 44-50
URL http://www.indiramahavidyalaya.com/pdf_show.php?unum=121

**Suggested Citation**
Mandavkar, Pavan, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय Farmers' Suicide in Vidarbha : Reasons and Remedies (January 29, 14). Available at SSRN: https://ssrn.com/abstract=3631573